# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:14.04.2026** **वार: मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तराखंडमधल्या 'दिल्ली-देहराडून इकॉनॉमिक कॉरिडॉर'चं उद्घाटन करणार.
2. भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 136 व्या जयंतीनिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमाचं आयोजन
3. अमेरिकेच्या नौदलाकडून इराणच्या सागरी क्षेत्रात नाकेबंदीला सुरुवात आणि
4. ज्येष्ठ गायिका आशा भोसले अनंतात विलीन

**<u>पंतप्रधान-उत्तराखंड</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज उत्तराखंडमधल्या देहराडून इथं 'दिल्ली-देहराडून इकॉनॉमिक कॉरिडॉर'चं उद्घाटन होणार आहे. यावेळी या कॉरिडॉरच्या उन्नत भागावरील वन्यजीव मार्गिकेचा आढावाही पंतप्रधान घेतील. 213 किलोमीटर लांबीच्या या सहा-पदरी कॉरिडॉरसाठी 12 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च आला आहे. या कॉरिडॉरमुळे दिल्ली आणि देहराडून दरम्यानच्या प्रवासासाठी वेळ अडीच तासांपर्यंत कमी होईल. आजच्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी देहराडूनजवळील डाट काली मंदिरात दर्शन घेऊन पूजा करतील.

**<u>राष्ट्रपती-गुजरात दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून त्या आज गांधीनगर इथल्या 'लोक भवन'मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'सामाजिक समरसता महोत्सवा'त सहभागी होतील. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यावेळी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर, राष्ट्रपती गांधीनगर इथल्या 'राष्ट्रीय रक्षा विद्यापीठा'च्या पाचव्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील.

**<u>डॉ.आंबेडकर</u>**

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 136 व्या जयंतीनिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. 14 एप्रिल 1891 रोजी मध्य प्रदेशात जन्मलेले डॉ. आंबेडकर यांनी आपलं संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यासाठी समर्पित केलं. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर आंबेडकर यांनी महिला, कामगार आणि वंचित समाजाला समान अधिकार मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेतले. या महामानवाला अभिवादन करण्यासाठी आज देशभरात विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

नवी दिल्लीमध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी आज संसद भवन परिसरात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी डॉक्टर आंबेडकर जयंती निमित्त त्यांना अभिादन केलं असून, देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केलं आहे. बाबासाहेबांनी राष्ट्र उभारणीसाठी केलेलं कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे; त्यांचे जीवन आणि कार्य पुढील अनेक पिढ्यांना प्रगतीशील समाजाच्या उभारणीसाठी प्रेरणा देत राहील असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्तानं महाराष्ट्रातही सर्वत्र विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**कृषी लागवड**

देशात उन्हाळी पिकांच्या लागवड क्षेत्रामध्ये लक्षणीय वाढ झाली असून, 64 लाख हेक्टरपेक्षा अधिक लागवड क्षेत्राची नोंद झाली आहे, असं कृषी मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत उन्हाळी पिकांच्या लागवड क्षेत्रात 77 हजार  हेक्टरची महत्त्वपूर्ण वाढ दिसून आली आहे. 30 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर भात पिकाची पेरणी करण्यात आली, तर 11 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर कडधान्यांची लागवड करण्यात आली. तसंच 'श्री अन्न' म्हणजेच भरड धान्यांच्या लागवडीखाली 13 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र नोंदवण्यात आलं. दरम्यान, तेलबियांच्या लागवडी खालील क्षेत्र 8 लाख हेक्टरपेक्षा अधिक नोंदवण्यात आल्याचं कृषि मंत्रालयानं सांगितलं आहे.

**मंत्रीमंडळ निर्णय**

महाराष्ट्र शासनाच्या विविध पदांची भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, याकरता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्याला काल मंत्रिमंडळानं मान्यता दिली. अधिक एकसंध, सुलभ, पारदर्शक, परिणामकारक आणि कालबद्ध निवड प्रक्रिया राबवण्यासाठी या सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यानुसार अराजपत्रित पदांसाठी कुठलीही मुलाखत यापुढं होणार नाही. तसंच पदभरतीमधल्या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या 102 होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्यानं 18 सेवांचा आणि 93 संवर्गाचा समावेश होईल. आकांक्षित जिल्हा आणि आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा विस्तार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं कालच्या बैठकीत घेतला. त्यानुसार या कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे. तत्पूर्वी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत काल ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आशा भोसले यांच्या संकल्पनेतील संगीत संस्था स्थापन करण्यासाठी सकारात्मक पावलं उचलण्यात येतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**अमेरिका**

अमेरिकेनं नौदलाची किमान 15 जहाजं मध्यपूर्वेत तैनात केली असून त्यामध्ये यूएसएस अब्राहम लिंकन या विमानवाहू जहाजासह 11 विनाशिकांचा समावेश आहे. इराणच्या बंदरांवर नाकेबंदी करण्याच्या उद्देशाने ही जहाजं तैनात करण्यात आली आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदीबाबत पाकिस्तानमध्ये झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नाकेबंदी करण्याचे आदेश दिले आहेत. इराणने अण्वस्त्र विकसित करू नयेत, असं अमेरिकेनं स्पष्ट केलं असून दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीच्या कालावधीत इराणने करार मान्य केला नाही, तर गंभीर परिणामांना सामोरं जावं लागेल असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

दरम्यान, आपल्या सागरी हद्दीतील हस्तक्षेपाबद्दल इराणने तीव्र नाराजी व्यक्त केली असून अशी नाकाबंदी सुरू राहिल्यास इतर प्रमुख प्रादेशिक बंदरे आणि सागरी वाहतुकीचे महत्त्वाचे मार्ग विस्कळीत करण्याचा इशारा इराणनं दिला आहे. या कठीण काळात विश्वासार्ह आणि संवेदनशील सहयोगी म्हणून मदत केल्याबद्दल भारतातील इराणचे राजदूत डॉ. मोहम्मद फथाली यांनी भारत सरकार आणि भारतीय जनतेचे आभार मानले आहेत. भविष्यातही दोन्ही देशांमधील सौहार्दपूर्ण संबंध असेच कायम राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**भारत-फ्रान्स**

भारत-फ्रान्स यांच्यात परराष्ट्र मंत्रालय स्तरावरील चर्चा काल पॅरिसमध्ये पार पडली. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि फ्रान्सच्या युरोप आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे महासचिव मार्टिन ब्रिएन्स यांनी याचं सह-अध्यक्षपद भूषवलं. या बैठकीदरम्यान द्विपक्षीय संबंधांच्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. विशेषतः भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या चर्चेत संरक्षण, नागरी अणुऊर्जा, अवकाश, सायबर आणि डिजिटल, एआय, संस्थात्मक संवाद यंत्रणा आणि परस्पर देवाणघेवाण तसंच सांस्कृतिक संबंधांना चालना देणारे उपक्रम यांसारख्या द्विपक्षीय सहकार्याच्या क्षेत्रांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**डीआरडीओ**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओच्यावतीनं बिहारमधल्या मोतिहारी इथं अत्याधुनिक तंत्रज्ञांन आणि प्रगत प्रणालीचं एक भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. उद्या म्हणजेच 15 ते 18 एप्रिल दरम्यान मोतिहारीमधल्या महात्मा गांधी प्रेक्षागृहात हे प्रदर्शन आयोजित केलं जाणार आहे. या प्रदर्शनात 'आकाश','ब्रह्मोस' आणि 'पृथ्वी' क्षेपणास्त्र सह इतर अनेक संरक्षण उत्पादनांच्या प्रतिकृतींचा समावेश असेल, असं डीआरडीओनं सांगितलं आहे.

**स्टार्टअप**

देशाच्या स्टार्टअप परिसंस्थेमध्ये भांडवलाचा ओघ वाढवण्यासाठी सरकारनं दहा हजार कोटी रुपयांच्या निधीसह 'स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंड्स 2.0' अधिसूचित केला आहे. या योजनेअंतर्गत प्राधान्य क्षेत्रांना समर्थन देणाऱ्या पर्यायी गुंतवणूक निधींवर लक्ष केंद्रित केलं जाईल, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं सांगितलं आहे. ही योजना देशाच्या नवोन्मेष-आधारित विकास धोरणाला पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल अशी अपेक्षा मंत्रालयांनं व्यक्त केली आहे. स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया अर्थात सिडबीद्वारे या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**लालूयादव**

'नोकरीच्या बदल्यात जमीन' प्रकरणाशी संबंधित राष्ट्रीय जनता दलाचे ज्येष्ठ नेते लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्ध सीबीआयनं दाखल केलेला एफआयआर आणि दोषारोपपत्र रद्द करण्यास सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला. लालू प्रसाद यादव रेल्वे मंत्री असताना, रेल्वे विभागात कथितरित्या करण्यात आलेल्या अनियमित नियुक्त्यांच्या बदल्यात जमिनीचे काही भूखंड त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या आणि निकटवर्तीयांच्या नावावर हस्तांतरित करण्यात आले होते, असा त्यांच्यावर आरोप आहे.

**ॲथलेटिक्स-महासंघ**

भारतीय ॲथलेटिक्स महासंघ या वर्षी महिला खेळाडूंसाठी SRY ही जनुकीय चाचणी अनिवार्य करण्याची शक्यता आहे. अशी माहिती दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स महासंघाचे अध्यक्ष डॉ. ललित भानोत यांनी काल कोहिमा इथं पत्रकार परिषदेत दिली. महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रथमच नागालँडमध्ये होत आहे; याचे यजमानपद नागालँड ॲथलेटिक्स संघटनेकडे असून, दोन दिवसांचा हा कार्यक्रम आजपासून कोहिमा इथं सुरू होणार आहे. मुख्यमंत्री नेफियू रिओ यांच्या हस्ते या सभेचं उद्घाटन होईल.

**अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशा भोसले यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अन्य मंत्री यांच्यासह चित्रपट आणि संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आशाताईंच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहिली. चित्रपट सृष्टीतल्या काही गायकांनी आशाताईंची गाणी गाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. काल सकाळपासून आशा भोसले यांचं पार्थिव त्यांच्या घरी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं; यावेळी विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांचं अंत्यदर्शन घेतलं.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.